# ‘टॅली सोल्यूशन’ची नवीन सिरीज सादर

**पुणे :** बिझनेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर कंपनी ‘टॅली सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड’ ने टॅली. इआरपी ९ सीरीज ए रीलिज ३.०’ हे नवे सुधारित सोल्यशून सादर केले आहे. ‘टॅली. इआरपी ९’ मध्ये रुपयाचे नवे चिन्ह अंतर्भूत करण्यात आले आहे. ‘जॉब वर्क’ वैशिष्ट्यामुळे व्यवसाय प्रक्रिया, तर ‘इन्कम टॅक्स फॉर पेरोल’ वैशिष्ट्यामुळे वेतन तपशील प्रक्रिया अत्यंत सोप्या झाल्या आहेत. या सर्व वैशिष्ट्यांमुळे टॅली हे आता भारताचे सर्वाधिक सर्वंकष असे व्यवसाय व्यवस्थापन सॉफ्टवेअर ठरले आहे. या संदर्भात कंपनीचे सहयोगी उपाध्यक्ष अरविंद के. एम. म्हणाले, की या नव्या सोल्यूशनमुळे रुपयाचे नवे चिन्ह वापरता येणार असल्याचे उद्योगांची आऊटपुट कपॅबिलिटीबाबतची तीव्र गरज पूर्ण झाली आहे.